प्रकल्प सारांश

आसवानी प्रकल्प विस्तारीकरण

(४५ किलोलिटर प्रती दिन ते १०० किलोलिटर प्रती दिन)

मु. पो. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर

मे. मुळा सहकारी साखर कारखाना लि.

प्रकल्प प्रवर्तक

मे. मुळा सहकारी साखर कारखाना लि,

मु. पो. सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर

१.० प्रस्तावना

मे. मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेड हा शेती आधारित कारखाना असून साखर, सह वीज आणि अल्कोहोल पदार्थ निर्मिती केली जाते. मे. मुळा सहकारी साखर कारखाना नोंदणी कंपनी कायदा १९५६ नुसार २७ फेब्रुवारी१९७० मध्ये करण्यात आलेली आहे. कारखान्याची नोंदणी क्र एएनजी/पीआरजी/(अ)टी ३०-७० दि. २७ फेब्रुवारी१९७०. रोजी झालेली आहे. कारखान्याना गट नं ८४८ – ८६५, ८६७- ८७२,८८५-८९०, ८९६ आणि ९१९- ९२१ मु .पो सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर, महाराष्ट्र येथे उभारण्यात आलेला आहे. आसवानी प्रकल्पाचे विस्तारीकरण ४५ किलो लिटर प्रतीदिन ते १०० किलो लिटर प्रतीदिन हे सध्या अस्तित्वात असणाऱ्या आसवानी प्रकल्पाच्या ठिकाणी होणार आहे.

सध्या साखर कारखान्याची गाळप क्षमता ७५०० प्रती दिन, ३० मेगा वॅट सह विज निर्मिती आणि ३० किलो लिटर प्रतीदिन आसवानी प्रकल्प इतकी आहे तर ३० किलो लिटर प्रतीदिन ते ४५ किलो लिटर प्रतीदिन आसवानी प्रकल्पाचे काम प्रगती पथावर आहे. सदर कारखान्यास पर्यावरण विभागाची मंजुरी घेतलेली आहे.

पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालय,भारत सरकारच्या ईआयए अधिसूचनेनुसार प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्प ५(ज) ग्रुपमध्ये वर्गीकृत आहे.प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पास राज्य पर्यावरण समितीमहाराष्ट्र राज्य यांच्या कडून , मंजूरी घेणे आवश्यक आहे.

त्यानुसार कारखान्याने प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाचा प्रस्ताव राज्य पर्यावरण समिती, महाराष्ट्र राज्य समितीकडे सादर केला. राज्य पर्यावरण समितीकडून पर्यावरण अभ्यासासाठी टीओआर ०४/०१/२१ रोजी प्राप्त झाला. त्यानुसार पर्यावरण प्रभाव मूल्यांकन अहवाल तयार करण्यात आला आहे.

१.१ प्रकल्पाचा तपशील

१.१.१ प्रकल्पाचे स्थळ

प्रकल्पाचे स्थळ हे गट नं ८४८ – ८६५, ८६७- ८७२,८८५-८९०, ८९६ आणि ९१९- ९२१ मु .पो सोनई ता. नेवासा जि. अहमदनगर, महाराष्ट्र येथे आहे. प्रकल्पाचे स्थळ हे ग्रामीण भागामध्ये आहे आणि प्रकल्पा पासून १७ किमी अंतरावर राहुरी रेल्वे स्टेशन व ४० किमी अहमदनगर आहे.

Project Location



१.१.२ प्रकल्पाची प्रमुख वैशिष्टे

अ. क्र	विवरण	तपशील
१	प्रकल्पाचे नाव आणि पत्ता	मे. मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं ८४८ - ८६५ ८६७- ८७२८८५-८९० ८९६ आणि ९१९- ९२१, पोस्ट- सोनई, तालुका नेवासा . जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र
२	अक्षांश रेखांश	१९° २२' ४५.३९" उ. ७४° ५०' २२.४२" पू
३	प्रकल्प क्षमता	सध्याचे: ७५०० टीसीडी, सध्याचे :३० मेगावॅट वीज निर्मिती सध्याचे: ४५ केएलपीडी आसवानी आसवानी प्रकल्प विस्तारीकरण ४५ किलोलिटर प्रती दिन ते १०० किलोलिटर प्रती दिन.
४	नवीन / विस्तार / आधुनिकीकरण	आसवानी प्रकल्प विस्तारीकरण ४५ किलोलिटर प्रती दिन ते १०० किलोलिटर प्रती दिन
५	सध्याची पर्यावरण मंजुरी	७५०० टीसीडी साखर, ३० मेगावॅट क्षमतेचे सह विद्युत प्रकल्प आणि ४५ केएलपीडी आसवानी प्रकल्पासाठी पर्यावरण मंत्रालयाकडून प्राप्त प्राप्त झाले.
६	संस्थेचे संविधान	सहकारी लिमिटेड

७	वर्षभरातील कार्य दिवसांची संख्या	साखर प्रकल्प१८० : हंगाम : दिवस सह विद्युत प्रकल्प : २१० दिवस, आसवानी प्रकल्प :२७० दिवस (४५ किलोलिटर प्रती दिन) ३०० दिवस (५५ किलोलिटर प्रती दिन)
८	जमीन क्षेत्राची आवश्यकता	प्रस्तावित प्रकल्पासाठी अतिरिक्त जमीन आवश्यक नाही. सध्याचे २८० एकर उपलब्ध आहे
९	पर्यावरण मंजुरी	१. साखर कारखाना क्षमता ५५०० टन प्रती दिन , ३० मेगा वॅट सह विज निर्मिती आणि ३० किलो लिटर प्रतीदिन ते ४५ किलो लिटर प्रतीदिन आसवानी प्रकल्पाचे विस्तारीकरण यासाठी पर्यावरण व वनमंत्रालय, नवी दिल्ली यांच्या कडून पर्यावरण मंजुरी प्राप्त झाली आहे. २. साखर कारखाना क्षमता ५५०० ते ७५०० टन प्रती दिन विस्तारीकरण प्रकल्पासाठी पर्यावरण विभाग महाराष्ट्र राज्य यांच्या कडून मंजुरी प्राप्त झाली आहे.
१०	मनुष्य बळ	साखर कारखाना : ७९२ सध्याच्या आसवानी प्रकल्प – २७ विस्तारीकरण आसवानी – ४७
११	बॉयलरची क्षमता आणि इंधन	**विद्यमान साखर कारखाना व सह वीज निर्मिती**: ८० टीपीएच व ८५ टीपीएच -२ अनुक्रमे स्टॅक उंची ७० व ७५ असे आहेत इंधन: बगॅस **प्रस्तावित आसवानी विस्तारीकरण –** २२ टीपीएच - ७५ मी चिमणी उंची इंधन: कोळसा, बगॅस आणि स्लोप
१२	पाण्याचा स्त्रोत	मुळा उजवा कालवा
१३	पाण्याची आवश्यकता घनमीटरदिन/	विद्यमान: साखर प्रकल्प: ७६० घनमीटर, सह विद्युत प्रकल्प: १५० घनमीटर, आसवानी प्रकल्प: ३०९ घनमीटर आसवानी प्रकल्प विस्तारासाठी: ८३५ घनमीटर

१४	सांडपाणी	साखर कारखाना : ६७० घनमीटर प्रती दिन , सह विद्युत प्रकल्प: १३० घनमीटर प्रती दिन. सांडपाणी प्रक्रिया केंद्रात केली जाते. **आसवानी प्रकल्प:** विद्यमान : स्पेंट वाश ३६० घनमीटर प्रती दिन सांडपाणी प्रक्रिया: बायोमिथेनेशन करून एम एम ई द्वारे प्रक्रिया केली जाते आणि बायोकंपोस्ट केले जाते. विस्तारीकरण: स्पेंट वाश ४७५ घनमीटर प्रतीदिन स्पेंट वॉशची एम एम ई द्वारे प्रक्रिया केली जाईल ,एकवटलेले स्पेंट वॉश २२ टि पी एच बॉयलर साठी इंधन म्हणून वापरले जाईल आणि कन्डेंसेट ची प्रक्रिया सी पी यू मध्ये केली जाईल.
१५	हरितपट्टा	विद्यमान: ९६.००एकर, सध्याच्या झाडांची संख्या ६४६६८ आहे
१६	प्रकल्पाचे मूल्य	विस्तारासाठी रु .८२५४ लाख कोटी

१.१.३ प्रस्तावित विस्तारीकरण प्रकल्पाची मूलभूत आवश्यकता

जमीन: कारखान्याची एकूण २८० एकर जमीन आहे. त्यामध्ये विद्यमान आसवानी प्रकल्प १३ एकर जमीनीवरती आहे. आसवानी प्रकल्पाच्या विस्तारीकरणासाठी ४.६९ एकर जमिनीची आवश्यकता आहे. विस्तारीकरणासाठी लागणारी जमीन कारखान्याकडे उपलब्ध आहे.

कच्चा माल:

साखर कारखान्यामधून निघणारी मळी ही आसवनी मध्ये कच्चा मालाच्या स्वरुपात वापरली जाईल. आसवनी प्रकल्पामध्ये तयार होणारे अल्कोहोल चे रासायनिक उद्योग, फार्मास्युटिकल उद्योग आणि इथॅनॉल म्हणून विविध उपयोग आहेत. प्रस्तावित विस्तारीकरण (५५ किलो लिटर प्रती दिन आसवनी) साठी आवश्यक असणाऱ्या मळीचे प्रमाण ७०२०० मेट्रिक टन हे इतके आहे आणि २४००० मेट्रिक टन मळी ४५ किलो लिटर प्रती दिन आसवनी साठी आवश्यक आहे.

पाणी: प्रकल्पाला शुद्ध पाण्याची गरज ११५९ घनंमीटर प्रती दिवस इतकी आहे (विद्यमान ३२४ घनंमीटर प्रती दिवस आणि विस्तारीकरण ८३५ घनंमीटर प्रती दिवस) हे पाणी मुळा उजवा कालवा मधून घेण्यात येईल.कारखान्याने पाणी उचलण्यासाठी ची परवांगी पाठबंधारे विभागाकडून घेतलेली आहे.

उर्जा :वाफ आणि वीज हि २२ टीपीएच बॉयलर आणि २ मेगावॅट टर्बाइन मधून पुरवली जाईल. विस्तारीकरणासाठी १४५५ किलोवॅट वीज आवश्यकता आहे.

इंधन :२२ टीपीएच बॉयलर साठी बगॅस, कोळसा आणि स्पेंटवॉशचा इंधनच्या स्वरुपात वापर करण्यात येईल

मनुष्यबळ:बांधकाम दरम्यान:५० व्यक्ती आणि

ऑपरेशन दरम्यान :

- सध्याच्या आसवानी प्रकल्प – २७
- विस्तारीकरण आसवानी – ४७

प्रकल्प किमंत :

५५ किलोलिटर प्रती दिन आसवनी प्रकल्प विस्तारीकरणासाठी ८२५४.६८ लाख इतका भांडवली खर्च येणार आहे. विस्तारीकरण हे १२ महिन्यामध्ये शासनाच्या सर्व परवानग्या घेऊन पूर्ण केला जाईल. पर्यावरण व्यवस्थापनासाठी एकून खर्च रु.११०० लाख आहे, कारखान्यासाठी आवर्ती खर्च रु.५६.६ लाख प्रती वर्ष आहे.

१.१.४ ईथॅनॉल उत्पादन प्रक्रिया :

कारखान्याच्या ताज्या मळीतही कर्बोदके आहेत.मळीत पाणी मिसळून यीस्ट जीवाणूंच्या सहाय्याने किण्वन क्रिया एका टाकीत केली जाते .त्याला लागणारी जीवनसत्त्वे पुरवली जातात .नंतर ऊर्ध्वपातनाने ईथॅनॉल मिळवले जाते.

ऊर्धपातन प्रक्रियेचे स्वरूप :

- मळी प्रक्रिया
- किण्वन प्रक्रिया
- ऊर्धपातन प्रकिया

१.२ पर्यावरण अभ्यास

प्रस्तावित प्रकल्पाच्या परिसरातील भौतिक वैशिष्ट्ये आणि विद्यमान पर्यावरणीय परिस्थितीचे सर्वेक्षण ऑक्टोबर २०२० ते डिसेंबर २०२० या कालावधीत केले आहे.

१.२.१ अभ्यास क्षेत्राचे पर्यावरण माहिती: प्रस्तावित प्रकल्प ग्रामीण भागामध्ये आहे .अभ्यास क्षेत्राची वैशिष्ट्ये खालील तक्त्यामध्ये वर्णन केली आहेत.

विशेष	तपशील
अक्षांश	१९° २२’ ४५.३९” उ.
रेखांश	७४° ५०’ २२.४२” पू
पत्ता	मे. मुळा सहकारी साखर कारखाना लिमिटेड, गट नं ८४८ – ८६५, ८६७- ८७२,८८५-८९०, ८९६ आणि ९१९- ९२१,

	पोस्ट- सोनई,, तालुका नेवासा , जिल्हा अहमदनगर, महाराष्ट्र
सरासरी समुद्रसपाटीपासूनची सरासरी उंची म्हणजे समुद्र पातळी	५३२.६२ मी समुद्र पातळी पासून
हवामान	कमाल तापमान; ३८.९ अंश से. किमान तापमान ११.७ अंश से. सरासरी पाऊस ; ६०० मी मी
सध्याचा जमीन वापर	साखर कारखाना सह वीज निर्मिती आणि आसवानी प्रकल्प
दळवळण मार्ग	रोड
जवळचा महामार्ग	अहमदनगर- औरंगाबाद राज्य मार्ग -६० -- ५किमी
जवळची रेल्वे स्टेशन	राहुरी१७ किमी
जवळचा विमानतळ	शिर्डी ७० किमी
जवळचे शहर	अहमदनगर ४० किमी
जिल्हाचे ठिकाण	अहमदनगर ४० किमी
गाव	सोनई
जवळचा नदी / पाणी साठा	मुळा उजवा कालवा
धार्मिक / ऐतिहासिक ठिकाण	नाही
पुरातत्व स्मारक	नाही
पर्यावरणीय संवेदनशील क्षेत्र / आरक्षित वने	नाही
सेस्मिक झोन	३







Toposheet No:

1. 47 I / 11
2. 47 I / 15

PROJECT	
CLIENT	Mula SSK Ltd., Sonai
TITLE	Toposheet Map

ULTRA-TECH Environmental Consultancy & Laboratory

ULTRA-TECH
Environmental Consultancy & Laboratory
(Lab. Gazetted by MoEF-Govt. of India)

Jai Commercial Complex, Eastern Express Highway, Khopat, Thane (W), Thane West, Thane, Maharashtra 400601, India

वातावरणीय वायू गुणवत्ता

अभ्यास क्षेत्रातील सभोवतालची हवा गुणवत्ता समजून घेण्यासाठी, आठ स्थान निवडले गेले आणि हवा गुणवत्ता सर्वेक्षण ऑक्टोबर ते डिसेंबर २०२० या दरम्यान करण्यात आले .

:10PM सर्वात जास्त ६८ µg / m ^{3}चे प्रमाण प्रकल्पाच्या ठिकाणी (1-AAQ)तसेच सर्वात कमी ४० µg / m ^{3} धनगरवाडी गावात) AAQ-3) आढळून आले. तपासणी निकालवरून असे निष्कर्षत होते की प्रकल्पाच्या क्रियाकलाप आणि वाहनांच्या हालचालीमुळे प्रकलपाच्या ठिकाणी प्रमाण जास्त आढळून आले .केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ निर्धारित,२४ तास सरासरीसाठी PM10 ची मानक मर्यादा १००µg / m^{3} आहे, विश्लेषण केलेल्या सर्व नमून्यांचे प्रमाण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळच्या मानकमर्यादेपेक्षा कमी आहे.

:2.5PMसर्वात जास्त प्रमाण प्रकल्पाच्या ठिकाणी २८ µg / m^{3} आढळून आले आणि सर्वात कमी प्रमाण धनगरवाडी १६.० µg / m ^{3}आढळून आले. २४ तास प्रति तास सरासरी 2.5PM ची मानक मर्यादा ६० µg / m^{3} आहे, सर्व ठिकाणी 2.5PM एकाग्रता अनुमत मानके खाली होती.

:SO2सर्वात जास्त मूल्य घोडेगाव येथे २३ µg / m^{3} आणि सर्वात कमी लोहेगाव आणि धनगरवाडी मधील १० µg / m ^{3}मूल्य नोंदीवण्यात आले.

:NOxसर्वात जास्त प्रमाण शनी शिंगणापूर २८ µg/m^{3} नोंदीवण्यात आले आणि सर्वात कमी मूल्य १२µg/m^{3} लोहेगाव मध्ये नोंदीवण्यात आले.

CO: सर्वात जास्त मूल्य १.७ mg/m^{3} सोनई आणि सर्वात कमी मूल्य ०.५ mg/m^{3} धनगरवाडी मध्ये नोंदीवण्यात आले .सर्व निरीक्षणीय CO मूल्य मर्यादेत आहेत;

वातावरणीय ध्वनी पातळी गुणवत्ता

पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालय आणि केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळच्या तत्वांनुसार ध्वनी पातळीची गुणवत्ता तपासण्यात आली.ध्वनी पातळी समजून घेण्यासाठी, आठ स्थाने निवडण्यात आली .ध्वनी सर्वेक्षण वेळ ०६.०० ते २२.०० तास आणि रात्र वेळ –२२.०० ते ०६.०० तासांपर्यंत केले होते. मिळालेल्या परिणामांची तुलना ध्वनी प्रदूषण नियम २००० च्या तुलनेत केली गेली आहे .प्रकल्पाच्या क्रियाकलापांमुळे आणि वाहनांच्या हालचालीमुळे प्रकल्पाच्या ठिकाणी उच्च आवाजाचा स्तर रेकॉर्ड केला गेला आहे.

पाणी गुणवत्ता

१० किमी त्रिज्यामध्ये भूतलावरील पाणी तपासणी साठी ६ ठिकाणाहून नमुने गोळा केले गेले आणि भूजल तपासणी साठी ७ वेगवेगळया ठिकाणाहून नमुने गोळा केले गेले

भूतलावरील पाणी :

- **सामू :** पाण्याचा सामू हा ७.८ ते ८.२ दरम्यान आढळला

- **विरघळेल्या पदार्थ'**: विरघळेल्या पदार्थाचे प्रमाण १७२ मिलीग्राम /लि ते ६६० मिलीग्राम /लि इतके आढळले.
- **बीओडी:** घेतेलेल्या ६ पाण्याच्या नुमुन्या पैकी ४ नमुन्यामध्ये बीओडी चेप्रमाण ३ मिलीग्राम/ली पेक्षा कमी आढळले.
- **सीओडी:** सीओडीचे प्रमाण १२ ते ३२ मिलीग्राम/ली च्या दरम्यान आढळले.
- **क्लोराइड;** क्लोराइडचे प्रमाण हे १९ ते८१ मिलीग्राम/ली च्या दरम्यान आढळले.
- **सल्फेट**: सल्फेटचे प्रमाण हे १८ ते १२० मिलीग्राम/ली च्या दरम्यान आढळले.

भूजल गुणवत्ता

- पाणी गुणवत्ता तपासणीसाठी घेतलेल्या ७ नमून्यांमध्ये सामु ७.६ ते ८.१२ दरम्यान आढळून आला .
- **विरघळेल्या पदार्थ'**: विरघळेल्या पदार्थाचे प्रमाण ३८८ मिलीग्राम /लि ते ६८० मिलीग्राम /लि इतके आढळले.
- **जडत्व :**एकूण पाण्याचे जडत्व २१६ते ४९२ मिलीग्राम /लि च्या दरम्यान आढळले.
- **क्लोराइड;** क्लोराइडचे प्रमाण हे ६८ ते ११३ मिलीग्राम/ली च्या दरम्यान आढळले.
- **सल्फेट**: सल्फेटचे प्रमाण हे ४६ ते १२४ मिलीग्राम/ली च्या दरम्यान आढळले

मातीची गुणवत्ता

- एकूण ८ नमून्यांमद्धे पीएचचे प्रमाण ७.0 ते ८.0 आढळून आले.
- मातीची पाणी धारण क्षमता ही अतिशय महत्वाची कृषी वैशिष्ट्ये आहेसर्व जमिनीतील नमुने. असे दर्शवितात की माती चांगल्या पाणी साठविण्याची क्षमता असलेली आहे.
- जमिनीतील जैविक पदार्थांचे प्रमाण ०.६ ते १.२.आहे %
- तसेच नत्र , स्पुरद आणि पालाश चे प्रमाण १२३ ते १५० किलो /हे , ५६ ते ८६ किलो /हे आणि २३६ ते ३८२ किलो /हे अनुक्रमे आढळले.

वनस्पती आणि प्राणी

१० किमी त्रीजेच्या क्षेत्रामध्ये वनस्पती आणि प्राणी सर्वेक्षण करण्यात आले. या अभ्यासानुसार ४० झाडांच्या प्रजाती , ३ वेल वर्गीय , ११ हरबज , १८ झुडुपेच्या प्रजाती आणि ५ गवत वर्गीय वनस्पतीच्या प्रजाती आढळून आल्या. त्यामध्ये निम, बाभूळ, घाणेर, रुई ,जास्वंद, वड, पिंपळ, उंबर, गुलमोहर, निरगुडी इ. वनस्पती आढळल्या.

सस्तन प्राण्याच्या ८ प्रजाती, पक्ष्याच्या २० प्रजाती, सरपटनाऱ्या प्राण्याच्या ६ प्रजाती आणि १३ फुलपाखरानच्या प्रजाती आढळून आल्या.

.

सामाजिक आर्थिक सर्वेक्षण

१० किमी अभ्यास क्षेत्रामध्ये गावे आहेत .भारताच्या २०११ च्या जनगणनेनुसार अभ्यास क्षेत्रा मध्ये एकून लोकसंख्या ९५३४३ आहे. क्षेत्राचा व्यावसायिक नमुना दर्शवितो की मुख्य +साधारण आणि बेरोजगारांची टक्केवारी अनुक्रमे ४८.७ %आणि ५१.३ %आहे .मुख्य कामगारांमध्ये बहुसंख्य शेतकरी आहेत, त्यानंतर शेतमजूर आणि इतर कामगार आहेत.

१.३ प्रभाव आणि उपायोजना

१.३.१ वायू वातावरणावरील प्रभाव

- विद्यमान ८५ टीपीएच बॉयलरसाठी ७५ मी उंचीची चिमणी आणि८२ टीपीएच बॉयलरसाठी ७० मी उंचीची चिमणी आणि ईएसपी यंत्रणाना बसविण्यात आली आहे.
- २२ टीपीएच इनसीनरेष्ण बॉयलर प्रस्तावित आहे.
- २२ टीपीएच इनसीनरेष्ण बॉयलरसाठी ७५ मी उंचीची चिमणी आंनी ईएसपी यंत्रणाना बसविण्यात येईल .
- प्रक्रियेमधून तयार होणाऱ्या ४४ टन प्रती दिन कार्बन डायऑक्साईड साठी कार्बन डायऑक्साईड प्लांट उभारला जाईल
- ऑनलाइन सतत निरंतर देखरेख प्रणाली स्थापित केली गेली आहे आणि सीपीसीबी मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रदूषण नियंत्रण मंडळाशी जोडली गेली आहे

१.३.२ पाणी आणि सांडपाणी व्यवस्थापन

- प्रस्तावित विस्तारीकरणासाठी पाण्याची आवशकता ८३५ घन मी /दिन इतकी आहे.
- ४५ किलो लिटर प्रती दिन आसवानी प्रकल्पातून ४५३ घन मी इतके स्पेंट वाश निर्माण होणार आहे. त्यांची प्रक्रिया बायोमेथेनेशन, एम एम ई द्वारे प्रक्रिया करून बायोकंपोस्टीग केले जाईल. एम एम ई मधून निघणारे कंडेनसेट सीपीयु मध्ये प्रक्रिया करून पुन्हा वापरले जाईल.
- ५५ किलो लिटर प्रती दिन आसवानी प्रकल्पातून ४७५ घन मी इतके स्पेंट वाश निर्माण होणार आहे.
- स्पेंट वॉशची एम एम ई द्वारे प्रक्रिया केली जाईल आणि कन्डेंसेट ची प्रक्रिया सी पी यू मध्ये केली जाईल ,एकवटलेले स्पेंट वॉश २२ टि पी एच बॉयलरसाठी इंधन म्हणून परत वापरले जाईल.
- नियमित पाणी गुणवत्ता नियंत्रण केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि पर्यावरण वन आणि हवामान बदल मंत्रालय यांनी निश्चित केलेल्या मानकांनुसार केले जाईल

१.३.३ घन कचरा व्यवस्थापन

- ९६ टन प्रती दिन इतके एकवटलेले स्पेंट वॉश बायोमेथेनेशन आणि एम एम ई द्वारे प्रक्रिया करून त्याचे बायोकंपोस्टीग केले जाईल.
- २२ टि पी एच बॉयलर मध्ये कोळसा, बगॅस आणि स्लोप इधन म्हणून वापरले जाणार आहे. त्यामधून तयार होणारी राख वीट निर्मितीसाठी विक्री केली जाईल.

१.४ पर्यावरणीय व्यवस्थापन आराखडा व खर्च

पर्यावरण व्यवस्थापन योजनेमध्ये पर्यावरणावरील दुष्परिणाम कमी करण्यासाठी संरक्षण व संवंधर्नाच्या उपाय योजना राबविण्यात येतील त्यासाठी कारखान्याचे व्यवस्थापन मंडळ वेळोवेळी आवश्यक ती उपाययोजना राबवतील

पर्यावरणीय व्यवस्थापन अंदाजपत्र

अ. क्रं.	तपशील	भांडवली खर्च रु. लाख	आवर्ती खर्च रु. लाख (प्रति वार्षिक)
१	वायु प्रदूषण नियंत्रण संयंत्रणा		
	चिमणी	७०.०	५.०
	ईएसपी	१२०.०	१०.०
	कार्बन डायऑक्साईड प्लांट	३००.०	५.०
२	सांडपाणी व्यवस्थापन		
	एमईई	४००.०	१०.०
	सीपीयू	१५०.०	१०.०
३	घन कचरा व्यवस्थापन	१५.०	५.०
४	हरित पट्टा विकास	-	५.०
५	पर्यावरण सर्वेक्षण (हवा, पाणी माती, ध्वनी इ.)		३.६०
६	रेन वॉटर हार्वेस्टिंग	२५.०	२.०
७	आरोग्य आणि सुरक्षितता	५.०	१.०
८	ऑनलाइन सतत निरंतर देखरेख प्रणाली	१५.०	२.०
	एकूण	**११००.०**	**५६.६**